# पोषणाकरिता कृषी पद्धती

MSSRF
Science for Sustainable Development

LANSA
Leveraging Agriculture for Nutrition in South Asia

भारत व दक्षिण आशिया तील बहुसंख्य लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती व्यवसाय आहे. या प्रदेशात मोठया प्रमाणातील लोकसंख्या कुपोषित आहे.

'लेव्हरजिंग ॲग्रीकल्चर फॉर न्युट्रीशन इन साउथ एशिया' लान्सा (LANSA) (www.lansasouthasia.org) या संशोधन संघ असलेल्या कार्यक्रमांतर्गत एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन मार्फत कुपोषण या समस्येच्या संबोधनाकरीता सद्या सुरू असलेला पोषणाकरिता कृषी पद्धती (Farming System for Nutrition) हा व्यवहार्यता अभ्यास आहे. या अभ्यासातील संशोधनात्मक प्रश्नाचा गाभा म्हणजे : कृषी हस्तक्षेप पोषणाच्या बाजूने असू शकतो हा पुरावा किती मजबूत आहे?

प्रा. एम. एस. स्वामिनाथन यांनी परिभाषित केलेल्या पोषणाकरिता कृषी पद्धती नुसार यात पोषणातील कमतरता कमी करण्यासाठी पोषणाच्या निकषांच्या नियमितते करिता कृषी पद्धतीतील विविध घटक ज्यात पिके, पशुधन व शक्य असेल तिथे मासे यांची निवड करतांना स्थान विशिष्ट कृषी उपायांना परिचीत करणे या बाबींचा विचार करण्यात येईल (Das et al 2014; Nagarajan et al 2014). हा एक हस्तक्षेपात्मक (Interventional) दृष्टिकोन असून यात शाश्वत उपाययोजनांच्या संयोजनाचा समावेश आहे ज्यात आधुनिक पिक उत्पादन पद्धती, जैव-युक्तता (biofortification), फळे आणि भाजीपाल्यांच्या पोषण बागेचा प्रसार, पशुधन व कुक्कुट विकास तसेच यासोबत पोषण जागृती इत्यादी संयोजनांचा उत्तेजक म्हणून समावेश करून सुसंगत अधिक उत्पादन व उत्तम पोषण मिळविणे या बाबी अंतर्भूत होतात. सर्व प्रकारच्या कुपोषणांना जसे उर्जेची कमतरता, प्रथिनांची कमतरता आणि (Hidden Hunger) लपलेली उपासमार (जसेः सुक्ष्म मुलद्रव्यांची कमतरता) संबोधीत करणे हे या अभ्यासाचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

**अभ्यास स्थान**

सदर अभ्यास महाराष्ट्राच्या विदर्भातील वर्धा जिल्हयातील पाच गावाच्या (२,२५४ लोकसंख्या ५५६ कुटूंबे) समूहामध्ये कार्यान्वीत आहे यात कारंजा तालुक्यातील सुसुंद, हेटी व बोरगाव तर आर्वी तालुक्यातील सहेली व बिटपूर या गावांचा समावेश आहे. हे क्षेत्र कोरडवाहू तसेच कुपोषणग्रस्त म्हणून दर्शविल्या गेलेले आहे. अभ्यासाची सुरवात कुटूंबांच्या सविस्तर मुलभूत सर्वेक्षणांने करण्यात आली (आ.क्र.१)




**आ.क्र. १ : पोषणाकरिताच्या कृषी पद्धती दृष्टीकोनातील टप्पे**

